**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला,
चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/९८२६५९ /२०२४ पिंपरी-चिंचवड    दिनांक- २५ /०५/२०२४

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना☆

मेट्रो प्रकल्पांतर्गत मदर टेरेसा फ्लाय ओव्हर ते भक्ती शक्ती चौक दरम्यान माती परिक्षणकरीता ८१ ठिकाणी लॉग बोअर घेणार असल्याने सदर मार्गावरील वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी विशाल गायकवाड, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### निगडी वाहतूक विभाग

१. भक्ती शक्ती चौकाकडुन येणारी जड अवजड वाहने हि टिळक चौकाकडे न जाता भक्ती शक्ती सर्कल वरुन अंकुश चौक —त्रिवेणीनगर चौक- दुर्गानगर मार्गे- थरमॅक्स चौक मार्गे इच्छित स्थळी जातील
२. भक्ती शक्ती चौकाकडुन येणारी लक्झरी बसेस या टिळक चौकाकडून खंडोबामाळ चौकाकडे न जाता त्या भेळ चौक -संभाजी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
३. दुर्गानगर चौकाकडुन येणारी जड अवजड वाहने डावीकडून खंडोबामाळ चौकाकडे न वळता सरळ भेळ चौक - संभाजीनगर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
४. खंडोबामाळ चौकाकडुन पिंपरीकडे सर्व्हिस रोडने जाणाऱ्या जड अवजड वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे.
५. टिळक चौकापासुन काळभोरनगर अंडरपासपासुन पुढे बीआरटी मधुन जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना परवानगी देण्यात येत आहे.

तरी वरील प्रमाणे वाहतुक बदल अधिसुचना (नोटीफिकेशन) करण्यात येत आहे.
सदरची अधिसुचनेची दिनांक २८/०५ /२०२४ पासुन अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी निगडी वाहतुक विभाग
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक बदलाबाबतचे माहीती फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with OKEN Scanner